7400105834

मिरा - भाईंदर महानगर पालिका
आ. क्र. 322 (माअ)
दाखल ता. 03/07/23

# केंद्र शासनाचा माहिती मिळविण्याचा अधिकार

## नमुना पत्र ३

प्रति,

**मा. माहिती अधिकारी सो.,**
**घनकचरा प्रकल्प,** / नगर सचीव सो
मिरा भाईंदर महानगपालिका, भाईंदर.

मिरा भाईंदर महानगरपालिका
सचिव विभाग
स.प./न.प./ज.प./का.प./मा.अ.
आवक क्र 28 दि. 04/07/2023

| | |
|---|---|
| ३) अर्जदाराचे नाव | **श्री. जॉर्जी संतोष गोविंद** माजी नगरसेवक |
| ४) अर्जदाराचा पत्ता | डोंगरी चौक, पो. उत्तन, ता.जि.ठाणे. पिन. नं. ४०१ १०६. |
| ३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशिल | १)उत्तन धावगी डोंगर येथील प्रकल्पाला मंजूरी सन २००२ साली मिळाली. मंजूर झालेल्या महासभेच्या संपूर्ण ठरावाची प्रत मिळावी. |
| ४) माहितीचा विषय | वरील प्रमाणे |
| ५) माहिती संबधीत कालांवधी | १५ दिवस |
| ९) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :- | वरील प्रमाणे |
| १०) माहिती टपालाद्वारे पाहिजे किंवा व्यक्तीशा आवश्यक आहे :- | शिर्ध टपालाद्वारे किंवा हॅंड डिलीवरी |
| ११) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन:- | जनहितांर्थ |

ठिकाण :- डोंगरी चौक, पो. उत्तन, ता.जि.ठाणे.

दिनांक :- २६/०६/२०२३

सही/-

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./28/2023-24 दिनांक :- 08/08/2023

प्रति,
श्री. जॉर्जी संतोष गोविंद,
डोंगरी चौक, पो. उत्तन,
ता. जि.ठाणे.

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**उत्तन धावगी डोंगर येथील प्रकल्पाला मंजूरी सन 2002 साली मिळाली मंजूर झालेल्या महासभेच्या संपूर्ण ठरावाची प्रत मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** 1) आपणांकडील दि. 26/06/2023 रोजीचा माहिती अधिकार नियमाअंतर्गत अर्ज.
2) या कार्यालयाकडील पत्र क्र. मनपा/सचिव/मा.अ./24/2023, दि. 07/07/2023.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, उत्तन धावगी डोंगर येथील प्रकल्पाला सन 2002 साली मंजुरी दिलेल्या महासभेच्या ठरावाच्या प्रतीची मागणी केलेली आहे.

त्या अनुषंगाने आपणांस उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या माहितीपोटी प्रती पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 5 पानांकरिता रुपये 10/- (अक्षरी रुपये दहा मात्र) इतके शुल्क महानगरपालिका फंडात भरणा करणेबाबत आपणांस कळविले होते. त्यानुसार आपण रुपये 10/- इतके शुल्क पावती क्र. 0364103 अन्वये दि. 07/07/2023 रोजी महानगरपालिका फंडात भरणा केल्याने, आपणांस संदर्भिय पत्र क्र. 02 मध्ये नमुद कागदपत्रांच्या साक्षांकीत प्रती या पत्रासोबत जोडून देत आहोत. (एकूण पाने 05)

सदर माहितीबाबत आपले समाधान न झाल्यास प्रथम अपिलीय अधिकारी तथा नगरसचिव श्री. वासुदेव शिरवळकर, नगरसचिव विभाग, तिसरा मजला, मुख्य कार्यालय, स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.) यांचेकडे 30 दिवसात प्रथम अपिल दाखल करता येईल.

Rcd 7/7/23

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Gorji santosh Govind.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे 401 101
सचिव विभाग

जा.क्र.मनपा/सचिव/मा.अ./२४ /2023-24

दिनांक :- ०६/०७/2023

प्रति,
श्री. जॉर्जी संतोष गोविंद,
डोंगरी चौक, पो. उत्तन,
ता. जि.ठाणे.

**विषय :-** **केंद्र शासनाचा माहितीचा अधिकारी 2005.**
**उत्तन धावगी डोंगर येथील प्रकल्पाला मंजूरी सन 2002 साली मिळाली मंजूर झालेल्या महासभेच्या संपूर्ण ठरावाची प्रत मिळणेबाबत.**

**संदर्भ :-** आपणांकडील दि. 26/06/2023 रोजीचा माहिती अधिकार नियमाअंतर्गत अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयांकित संदर्भित पत्रान्वये आपण, उत्तन धावगी डोंगर येथील प्रकल्पाला सन 2002 साली मंजुरी दिलेल्या महासभेच्या ठरावाच्या प्रतीची मागणी केलेली आहे.

त्याअनुषंगाने आपणांस घनकचरा प्रकल्पासंबंधीत मा. महासभा दि. 20/11/2003 प्रकरण क्र. 50, ठराव क्र. 35 व सर्वसधारण सभा दि. 31/10/2001 विषय क्र. 9, ठराव क्र. 383 या ठरावाच्या साक्षांकित प्रत उपलब्ध करुन देत आहोत.

उक्त माहितीकरिता लागणारे शुल्क प्रति पान रुपये 2/- याप्रमाणे एकूण 5 पानांकरिता रुपये 10/- (अक्षरी रुपये दहा मात्र) महानगरपालिका फंडात भरणा करुन पावतीची छायांकित प्रत जमा करुन माहिती घेण्यात यावी.

कळावे.

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

Recd 7/7/23

पावती क्रमांक :- ३६४७०३ = १०/-
दि. ०७/०७/2023

pc 2U:\01 Pranali\Mahiti Adhikar\Letter - Gorji santosh Govind.docx

# मिरा भाईंदर नगरपालिका
## सर्वसाधारण सभा दि. 31/10/2001

**विषय क्र. 9 :-** **घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियमाप्रमाणे प्रकल्प अहवाल तयार करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देणे.**

**ठराव क्र. 383 :-**

मा. संचालक नगरपालिका प्रशासन यांचे समवेत नाशिक येथे झालेल्या “अ” वर्ग नगरपालिकेच्या सभेमध्ये प्रत्येक नगरपालिकेने पर्यावरण व घनकचरा व्यवस्थापन हाताळणे नियमाप्रमाणे प्रकल्प अहवाल तयार करणेबाबत मार्गदर्शन केलेले आहे. त्याप्रमाणे प्रत्येक “अ” वर्ग नगरपालिकेने प्रत्येक वर्षी जुलै पूर्वी वरील विषयाचा अहवाल तयार करुन शासनाकडे अहवाल पाठविणेचा आहे. नगरपालिकेने नगरपालिकेकडे या विषयाबाबत तांत्रिक कर्मचारी नसल्यामुळे सदरचा अहवाल नगरपालिकेमार्फत तयार करणे शक्य नाही. त्यामुळे याबाबतचा अहवाल खाजगी तज्ञ व्यक्तीकडून करुन घेणेचे सोयीचे होईल. या अहवालाबाबत राज्यसरकार व केंद्रसरकार यांनी मार्गदर्शन दिलेले आहे. या सुचना लक्षात घेवून वरील विषयाचा अहवाल तयार करणेकामी तज्ञ व्यक्तीकडून निविदा मागविणेस ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

**सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**
**अनुमोदन :- श्रीम. जेन्वी अल्मेडा**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

माहिती अधिकार ... अन्वये उपलब्ध
करुन देण्यात ... ची सत्यप्रत
मिरा भाईंदर महानगरपालिका

**सही/-**
**नगराध्यक्ष**
**मिरा भाईंदर नगरपालिका**

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मा. महासभा दि. २०/११/२००३.**

**प्रकरण क्र. ५० :-** घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प राबविणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणे. (दि. २०/०५/२००३ रोजीचे तहकुब प्रकरण क्र. १०)

**ठराव क्र. :-** ३५

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७(अ) अन्वये पर्यावरण अहवाल तयार केला नाही. घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी २००० नियम पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ अन्वये तयार करुन सर्व नगरपालिका व महानगरपालिकेला लागू केले आहेत.

या नियमांतील तरतुदीनुसार नागरी कचरा घरोघरुन नगरपालिकेने गोळा करणे, कम्युनिटी कचरा पेटीची व्यवस्था, घंटागाडीची व्यवस्था, सुरक्षित वाहतुक व्यवस्था, लिचेट द्रवपदार्थ गळती न होण्यासाठी उपाययोजना, भटकी कुत्री व प्राणी यांचा कचरा गोळा केल्याजागी संचारबंदी, कचऱ्याचे विघटन, कचऱ्यापासून सेंद्रीय खत निर्मिती, पुनप्रक्रिया किंवा पुननिर्माण, मिथेन वायुपासून शक्य झाल्यास विजनिर्मिती व त्यासाठी उभारावयाच्या यंत्रसामुग्री व प्रक्रियेसाठी प्रकल्प उभारणी, विघटन न झालेल्या वस्तुचा जमिन भरणी, त्यासाठी लागणारी जमीन, प्रकल्प उभारणीसाठी जमिन इत्यादींची उपलब्धता करुन देण्यासाठी तत्कालीन नगरपालिकेने क्र. ३८३ ठरावान्वये दि. ३१/१०/२००१ रोजी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे.

त्यानुसार घंटागाडीचा, टाकाऊ औषधे व्यवस्थापन व हाताळणी नियम १९९८ अन्वये जैविक व कोषिकाविष टाकाऊ द्रव्यांची वाहतुक व्यवस्था इत्यादी उपक्रम सुद्धा तत्कालीन नगरपालिकेने सुरु केले होते.

महानगरपालिका स्थापन झाली. आज १ वर्ष ९ महिने निघून गेले. त्यात ६ महिन्यांचा कालावधी प्रशासकीय व १ वर्ष ३ महिने निवडून आलेल्या लोकप्रनिधींना झाले. परंतु दुर्दैवाने यामध्ये पुढे कोणतीही प्रगती झाली नाही. सन्मा. अधिकारी व पदाधिकारी यांनीही यामध्ये कोणताही रस दाखविला नाही.

डंपींग ग्राऊंडच्या आरक्षणाची प्रक्रीया महानगरपालिकेने सुरु केली. ती आजपर्यंत प्रलंबित आहेत.

सभागृहात कचरा विल्हेवाट व प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारण्यासाठी दिर्घ काळानंतर धोरणात्मक निर्णयासाठी प्रकरण क्र. १० अन्वये दि. २०/०५/२००३ च्या महासभेत ठेवण्यांत आला असता ती सभा तहकूब केली.

आज दि. २०/११/२००३ रोजी म्हणजे तब्बल ६ महिन्यानंतर पुन्हा सदर विषय सभागृहापुढे आणला आहे. दरम्यानच्या काळात दि. ३१/१२/२००१ पुर्वी अस्तित्वात असलेल्या

माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणारी सत्यप्रत
(कैलास ... )
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

भुभरण्याच्या जागा नियमाप्रमाणे विकसित करणे. दि. ३१/१२/२००२ पुर्वी भविष्यकाळात भुभरण्यासाठी जागा निश्चित करण्यांत याव्यात व दि. ३१/१२/२००३ पुर्वी घनकचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प उभारणे व प्रक्रिया न होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावणे याबाबतीत कोणतीही प्रगती प्रशासन व पदाधिकारी यांनी केली नाही.

कचरा गोळा करण्यासाठी कम्युनिटी बिनची व्यवस्था, घंटागाडी, कचऱ्यातून लिचेट द्रव्याची गळती न होऊ देणे, कचरा साठविणे ठिकाणी व जमा करण्याच्या जागी भटक्या कुत्र्या व प्राण्यांना संचारबंदी, विविध कचऱ्यांचे विघटन, कत्तलखान्यांतील कचरा, टाकाऊ औषधे व औद्योगिक प्रक्रिया कचरा, नागरी कचऱ्या समवेत मिश्र होऊ न देणे, सुरक्षित कचरा वाहतुक, नादुरुस्त इमारतींचे टाकाऊ बांधकाम साहित्य व कचरा वेगळा करुन विल्हेवाट लावणे, सुका कचरा न जाळणे इत्यादी बंधने असूनही पाळली नाहीत. नागरिकांचा सहभाग होण्यासाठी महानगरपालिकेने जागरुकता अभियान राबविले नाही.

लोकसंख्येच्या दाटीनुसार व त्यातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याच्या साठवणीसाठी व्यवस्था करणे, त्या जागा मोकळ्या वातावरणात खुल्या स्वरुपाच्या नसाव्यात. कचरापेट्या सहजगत्या हाताळण्यात येण्यासारख्या असाव्यात. त्यांची मानवी हाताळणी होऊ नये ह्यासुद्धा तरतुदी झालेल्या नाहीत.

दैनंदिन कचऱ्याची वाहतुक व्यवस्था बहुउद्देशीय कचरा वाहतुक व्यवस्था, घनकचऱ्यावर सेंद्रिय खत निर्मितीसाठी प्रक्रिया, पुननिर्माण व इनसिन रेडान प्रक्रिया, व प्रक्रिया न होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट करण्याबाबत आपल्याकडून आजपर्यंत प्रगती झालेली नाही.

पर्यावरण संरक्षण १९८६च्या कायद्यानुसार तयार केलेल्या घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० अन्वयें प्रस्तुत केलेल्या अनुसुची I मधील नियम ४(२) व (३) प्रमाणे व अनुसूचित II मधील नियम क्र.६(१) आणि ३, ७(१) मधील क्र. १ ते ६ मधील कार्यवाही करण्याबाबत महानगरपालिकेकडून स्पष्टपणे कोणतीही कार्यवाही केली नाही.

महानगरपालिकेने मौजे पाली येथील सर्वे नं. ६५(४८) मौजे उत्तन सर्वे नं. २५ क्षेत्र अ.क्र. १०-७२-० व २०-७२-० अशी एकूण ३१ हेक्टर ४६ आर ही जमीन महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये घनकचरा प्रक्रिया व प्रकल्पासाठी आरक्षित केली आहे. त्यानुसार शासनाने पुढील कार्यवाही अंतर्गत अधिसुचना जारी करण्यांत आली. त्यावेळी अनेक नागरिकांच्या सुचना, हरकती व तक्रारी नोंदविण्यांत आल्या.

महानगरपालिकेने पर्यायी जागा म्हणून आरक्षण क्र. ३८ अंतर्गत पर्यटन केंद्रासाठी आरक्षित असलेली जागा घनकचरा प्रकल्पासाठी मागितली असता महानगरपालिकेची मागणी महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने लेखी फेटाळून लावली.

सदर जागेचा आगाऊ ताबा मा. आयुक्त ह्यांनी मा. जिल्हाधिकारी यांचेकडे मागणी केली असता मा. जिल्हाधिकारी यांनी पत्र क्र. महसुल/क्र-१/टे-१/एल.बी.पी./का.वि.-१५७२/२००२,

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली सत्यप्रत
मिरा भाईंदर महानगरपालिका

दिनांक २६/१२/२००२ अन्वये सदर जागेचा आगाऊ ताबा महानगरपालिकेकडे दिला आहे. परंतु त्या जमिनीची किंमत रु. ४८,५४,१२,०००/- एवढी शासनास भरणा करण्यांस फर्माविले आहे.

राज्य शासनाने काढलेली आरक्षणाची अधिसुचना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(२) अन्वये सदर आरक्षण कायम करण्याबाबत व अयोग्य ठरविण्याबाबत मा. संचालक सक्षम आहेत. आरक्षण कायम करण्याबाबतचा हा प्रस्ताव मुदतबाह्य झाला असून प्रलंबित आहे.

महानगरपालिका पदाधिकारी व अधिकारी यांनी पर्यायी जागा म्हणून भिवंडी, ठाणे व मिरा भाईंदर ह्या तिन्ही नगरपालिकांचा संयुक्त घनकचरा प्रकल्प राबविण्यासाठी ६ महिन्यापुर्वी टेमघर भिवंडी भागातील जागा निवडली होती. परंतु सदर बाबी महानगरपालिका सभागृहापुढे लेखी व तोंडी विषय स्वरुपात आलेल्या नाही. तरीही अशा प्रकारच्या प्रस्तावास तेथील स्थानिक नागरिकांनी व राजकीय नेत्यांनी विरोध दर्शविला आहे. तसेच ठाणे, भिवंडी ह्या स्थानिक संस्थांनी मिरा भाईंदर समवेत स्टेम ॲथॉरिटी मार्फत एकत्रित प्रकल्प राबविणेसाठी प्रस्ताव लेखी स्वरुपात किंवा तोंडी स्वरुपात कोणत्याही सभेत आणलेला नाही.

तसेच स्टेम प्राधिकारणाची कायदेशीर वैधता मर्यादित स्वरुपाची असल्याने सदर प्राधिकरण सक्षम आहे किंवा नाही याबाबत निश्चितपणे सांशकता आहे.

पाली, उत्तन येथील जागेची पहाणी प्रदुषण नियंत्रण बोर्डाने करुन प्राथमिक स्वरुपाच्या अटीशर्तीची पुर्तता महानगरपालिकेकडून झालेली आहे. पुढील चेकलिस्टबाबत महानगरपालिकेकडून कार्यवाही चालू आहे.

वरील जागेतील आरक्षण अंतिम मंजुरीची कालबाह्यता किंवा प्रलंबितता कायम असावी तरीही सदर आरक्षणाची आता गरज राहिलेली नाही. कारण शासनाने महसूल व वनविभाग शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २००२/प्र.क्र. ३६३/ज-१ प्रमाणे दि. २/९/२००३ रोजीच्या परिपत्रकाप्रमाणे कोणत्याही शासकीय जागा मग त्या ना विकास क्षेत्राखाली असल्या तरीही अशा जमिनीचा आगाऊ ताबा महानगरपालिकेस घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी देण्यांत याव्यात. त्यामुळे सदर जागेवर आरक्षण करण्याचा प्रस्ताव अंतिम होण्याची प्रतिक्षा करण्यांत येऊ नये.

महत्वाची बाब म्हणजे सदरच्या जागेसाठी मा. जिल्हाधिकारी यांनी रु. ४८,५४,१२,०००/- ची जागेची किंमत मागितली आहे. महानगरपालिकेने आपल्या अंदाजपत्रकात रु. १.५० कोटींची तरतुद केली आहे. परंतु दि. २/९/२००३ च्या परिपत्रकानुसार सदर जमिन महसुलमुक्त व सारामाफी वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून विनामुल्य जिल्हाधिकारी यांनी महानगरपालिकेला हस्तांतरीत करण्याची निर्देश राज्य शासनाने दिले आहेत.

संविधानाच्या परिच्छेद क्र. २१, भाग ४ व परिच्छेद क्र. ४८अ, भाग ४अ परिच्छेद (आर्टीकल) ५१अ भाग ९अ परिच्छेद २४३(डब्ल्यु) व १२व्या अनुसूचितील क्र. ६ व ८ च्या खालील योजना व उपक्रम राबविण्याची व घटनेतील तरतुदीनुसार पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत

माहिती अधि... करुन देण्यात ...
...ची सत्यप्रत
...माहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

घनकचरा व्यवस्थापन व हाताळणी नियम २००० नुसार घनकचऱ्यावरील प्रकिया करण्यासाठी व प्रक्रिया न होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान उपलब्ध असलेल्या प्रकल्पकर्त्यांकडून निविदा मागवून मौजे पाली सर्वे नं. ६५(४८) क्षेत्र १०.७२.० हे आर प्रति मौजे उत्तन येथील सर्वे नं. २५ क्षेत्र २०.७२.० हे आर प्रति हा एकुण ३१ हेक्टर ४६ आर या शासकीय जागेत घनकचरा प्रक्रिया व प्रकिया न झालेल्या कचऱ्याची विल्हेवाट यासाठी प्रकल्प उभारण्यास ही सभा प्रशासकीय मंजुरी, तांत्रिक मंजुरी व आर्थिक मंजुरी देत आहे.

दिनांक २०/११/२००३.
वेळ १५.३०वा.

सुचक :- श्री. प्रफुल्ल का. पाटील. अनुमोदन :- श्री. शशिकांत भोईर.

ठराव सर्वानुमते मंजुर

मा. महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

माहिती अधिकार अधिनियम 2005 अन्वये उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या कागदपत्रांची/अभिलेखाची सत्यप्रत

(कैलास दामोदर म्हात्रे)
जनमाहिती अधिकारी
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

एक वोट से होती जीत हार, वोट न कोई हो बेकार

M.A.C. Form No. 2

नमुना नं. २

See Rule 12, 110 (2) 114 116, (2) and 117, (1) (2) & (3)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## सर्वसाधारण पावती

पु. No.: 3642

पा. No. 0364103

श्री. ______________ यांच्याकडून ______________ बद्दल

______________ रुपये (अक्षरी रु. ______________ मिळाले)

दिनांक ______________

लिपीकाची सही

प्राधिकृत अधिकाऱ्याची सही

______________ रोकड वहीत नोंद केली.

पृष्ठ क्रमांक ______________

लेखापाल / रोखपाल